**CNRNO.MHPU170012302024**

**किरकोळ अर्ज क्र. १०/२०२४**
**पायल सौरभ संघवी व इतर**
**वि.**
**सौरभ जवाहर संघवी**

**<u>निशाणी ०५ खालील आदेश.</u>**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा जाबदेणार कडून मुळ अर्ज निकाली होई पावेतो अंतरीम आर्थिक सहाय्य आदेश पारित होऊन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**<u>अर्जदारांचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–</u>**

२. अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार क्र. १ व जाबदेणार यांचा विवाह दिनांक २७/०२/२०२० रोजी बारामती येथील महावीर भवन येथे अर्जदार क्र. १ हिचे आईवडीलांनी सुमारे १० ते १५ लाख रुपये खर्च करुन तसेच सर्व संसार उपयोगी वस्तु देउन केला. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही जाबदेणार यांचेकडे माळेगाव बु. येथे नांदणेस गेली. त्यानंतर दोन दिवस माहेरी राहून परत जाबदेणार यांचेकडे नांदणेस गेली. ती परत गेल्यानंतर आठ ते दहा दिवसात जाबदेणार यांनी अर्जदाराशी लहान–सहान गोष्टीवरुन भांडणेस सुरुवात केली. घरातील सर्व कामे निट करत नाही व काही येत नाही, आईवडीलांनी हिला काही शिकविले नाही असे म्हणून जाबदेणार अर्जदार क्र. १ हिस मानसिक त्रास देत असत. अर्जदार क्र. १ हिस तिच्या पंसतीचे कपडे घालणेस परवानगी न देणे, मोबाईल वापरु न देणे इत्यादी प्रकारच्या गोष्टी जाबदेणार अर्जदार क्र. १ सोबत वारंवार करत तसेच केवळ वडीलांमुळे तिच्याशी लग्न केले आहे असे सांगून अर्जदार क्र. १ हिस अपमानास्पद वागणूक देत असत. अर्जदार क्र. २ हिचा जन्म झालेनंतर देखील जाबदेणार यांनी अर्जदार क्र. १ हिस मानसिक त्रास देणे बंद केले नाही. मुलगी झालेचा राग मनात धरुन जाबदेणार यांनी अर्जदार क्र. १ हिस जास्तच त्रास देणेस सुरुवात केली त्याचप्रमाणे ''तुझ्या आईवडीलांनी लग्नामध्ये आमचा मानपान केला नाही, माहेरहून फ्लॅट घेणेसाठी १५,००,०००/–रुपये घेउन ये'' अशी मागणी जाबदेणार अर्जदार क्र. १ हिच्याकडे करत होते. अर्जदार क्र. १ हिने जाबदेणाराची पैशाची मागणी पुर्ण न

केल्यामुळे अर्जदारांना जाबदेणार यांनी घरातून हाकलून दिले. ब–याच वेळा प्रयत्न करुनही जाबदेणार यांनी अर्जदार क्र. १ हिस नांदायला नेले नाही व अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची कोणतिही सोय केली नाही.

३. अर्जदारांनी अर्जामध्ये पुढे असे कथन केले की, प्रस्तुत अर्जाचे कामी अर्जदार हिस प्रत्येक तारखेस न्यायालयात हजर रहावे लागते, अर्जदार ही सध्या लासुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे येथे राहत असल्याने तिस प्रवास खर्च तसेच वकील फी व इतर खर्च, दवाखान्याचा खर्च याप्रमाणे खर्च करावा लागत आहे. अर्जदार हिस स्वतंत्र असे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही व ती स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ आहे. त्यामुळे अर्जदार हिचेवर उपासमारीची वेळ आली आहे. उलट जाबदेणार हा फार्मसी कॉलेजमध्ये शिक्षक म्हणून नोकरीस असून त्यास दरमहा ८० ते ९० हजार रुपये पगार मिळतो. तसेच किराणा दुकान असून सदर दुकानापासून प्रत्येक दिवशी २५ ते ३० हजार रुपये म्हणजेच महिन्याला ८ ते ९ लाख रुपये उत्पन्न मिळते तसेच दोन गाळे भाडयाने असून सदर गाळयास २०,०००/– रुपये भाडे मिळते. त्यामुळे जाबदेणार यांची अर्जदार यांना अंतरिम पोटगी देण्याची ऐपत आहे. जाबदेणार यांनी अर्जदारांची अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार, दवाखाना याबाबत कोणतिही सोय केलेली नव्हती व नाही. अर्जदार यांना अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार तसेच कोर्ट कामासाठी गावावरून येणे जाणेचा खर्च तसेच वकील फी यासाठी खर्च करावा लागत आहे. अर्जदाराला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. ती स्वतःचा चरितार्थ चालविण्यास समर्थ नाही. उलटपक्षी जाबदेणार यास नोकरी असून किराणा दुकान व दोन गाळे देखील आहेत. करिता, अर्जदार हिने जाबदेणारकडून अर्जदार हिस दरमहा रक्कम रुपये २०,०००/– अंतरीम आर्थिक सहाय्य देण्याचा आदेश होण्याची विनंती केली आहे.

४. जाबदेणाराने निशाणी ११ वर म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचे अर्जास विरोध दर्शविला आहे. जाबदेणाराने अर्जदाराचे अंतरीम पोटगीच्या अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. परंतु अर्जदारांशी असलेले नातेसंबंध मान्य केले आहेत. अर्जदार क्र. १ ही जाबदेणार क्र. १ ची कायदेशीर पत्नी असताना देखील अर्जदार क्र. १ हिने कोणतेही वाजवी कारण नसताना जाबदेणाराचा

आपखुषीने त्याग करून मुलगी संजीवनी हिला घेवुन तिचे माहेरी राहत आहे. तसेच जाबदेणार यांनी वारंवार प्रयत्न करून देखील अर्जदार क्र. १ ही जाबदेणार यांचेकडे नादावयास आली नाही. असे असताना अर्जदार यांनी वकीलांमार्फत खोटा व बनावट मजकुर नमुद करून दिनांक १५/०२/२०२४ रोजी नोटीस पाठविलेली होती. परंतु जाबदेणार क्र.१ यांना अर्जदार यांनी पाठविलेली नोटीस मान्य व कबूल नसलेले जाबदेणार यांनी अर्जदार यांची सदरील नोटीस नाकारत वकील राजेंद्र दी. काटे–देशमुख यांचे मार्फत अर्जदार यांचे नोटीसीस उत्तर दिले व अर्जदार यांनी जाबदेणार यांचेकडे विना अट नांदावयास येणेबाबत विनंती केलेली होती व आहे. तसेच या पुर्वी देखील जाबदेणार व त्याचे घरच्यांनी अर्जदार यांनी जाबदेणार यांचेकडे नांदावयास यावे म्हणुन विनंती केली परंतु त्यातेळी अर्जदार अथवा त्यांचे आई वडीलांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे जाबदेणार हे त्यासाठी कादेशीर कार्यवाही देखील करत आहेत. त्यामुळे तुम्ही कोणतेही वाजवी कारण नसताना स्वतःहुन जाबदेणार यांचा त्याग केलेला असुन त्यांना संसार सुखापासुन वंचीत ठेवत आहात, तसेच जाबदेणार यांची कोणतीही चुक नसताना केवळ त्यांना मानसीक त्रास देण्यासाठी म्हणुन वेगवेळ्या खाट्या केसेस केल्या आहेत. अशाप्रकारे अर्जदार या जाबदेणार यांचा मानसिक व शारिरीक छळ करीत आहेत. असे असुन देखील झाले गेले सर्व विसरून अर्जदार व लहाण मुलगी संजीवनी हिचा विचार करून तिला आई वडील, आजी, आजोबा यासर्वांचे प्रेमाची व सहवासाची गरज आहे, याची जाणीव ठेवत आजदेखील जाबदेणार हे अर्जदार हिस नांदविण्यास तयार आहेत. अर्जदार हिचे आई–वडिलांची आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली असुन अर्जदार स्वतःदेखील नोकरी करीत असल्यामुळे ती जाबदेणार यांचेवर अवलंबुन नाही. असे असताना केवळ जाबदेणार यांना शाररीक, मानसीक व आर्थिक त्रास व्हावा याकरीता म्हणुन प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला असल्याचे दिसुन येत आहे. अर्जदार यांनी जाबदेणार यास जाणूनबजुन त्रास देण्याचे दुष्ट हेतुने प्रस्तुतवा खोटा व बनावट अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्जदार हिचा प्रस्तुतचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे. जाबदेणार यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असून त्यांना कोणताही कामधंदा होत नाही. जाबदेणार यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे जाबदेणार हा कसेबसे त्याचे कुटूंबाचा

उदरनिर्वाह चालवित आहे. जाबदेणार हे अर्जदार यांना उचलून पोटगी देवू शकत नाहीत व अर्जदार यांना जाबदेणार यांचेकडून पोटगी मागणेचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. करीता, जाबदेणाराने अर्जदाराचा अंतरीम मागणीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

५. अर्जामधील कथने, जाबदेणारचे अर्जास म्हणणे तसेच अभिलेखावर दाखल प्रथमदर्शनी पुरावा व अर्जदार व जाबदेणार यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद याचा विचार करता, सदर अर्जाच्या निकालासाठी खालील वादप्रश्न उपस्थित होतात. सदर वादप्रश्नांवरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अर्जदार त्यांच्या मागणीप्रमाणे अंतरीम मागणीचा आदेश पारित होऊन मिळण्यास पात्र आहेत काय? असल्यास स्वरुप काय ? | .. | होय. अंतिम आदेशाप्रमाणे |
| २ | आदेश काय? | .. | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |

## -: **कारणमिमांसा:-**

६. अर्जदारातर्फे विद्वान वकिल श्री. ए. पी. झणझणे व जाबदेणारतर्फे विद्वान वकिल श्री. आर.डी. काटे-देशमुख यांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार व जाबदेणार यांनी त्यांचे कथनाच्या पृष्टयर्थ विविध लेखी पुरावे सादर केले. त्याचा उल्लेख या पुढे विवेचनात संदर्भानुसार करण्यात आला आहे.

**वादप्रश्न क्र. १ व २ बाबतः-**

७. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५(१) नुसार अंतरीम पोटगी मागणीचा अर्ज निकाली करते समयी जाबदेणाराने त्याची आर्थिक परिस्थिती असताना देखील अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार दिला आहे व टाळाटाळ केली आहे का हे पाहणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अंतरिम पोटगी भत्ता मंजूर करताना अर्जदारांची आर्थिक स्थिती आणि उभयपक्षांची दैनंदिन दिनचर्या व त्यांना सद्यस्थितीत आवश्यक असलेला खर्च या सर्व बाबी विचारात घेणे आवश्यक ठरते. सदर कायद्यातील परिस्थितीस अनुसरुन प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख पाहिला असता अर्जदार व

जाबदेणार यांनी अर्जाचे व म्हणण्याचे पृष्ठ्यर्थ शपथपत्र दाखल करुन एकमेकांविरुध्द कथने केली आहेत. अशा परिस्थितीत अर्जदार व जाबदेणार यांच्या शपथपत्रातील कथना व्यतिरीक्त अभिलेखावर आलेला पुरावा पाहीला असता असे दिसुन येते की, जाबदेणाराने अर्जदार क्र. १ व २ हे अर्जदार क्र. १ च्या माहेरी राहत असलेपासून अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार याची सोय केली नाही. तसेच जाबदेणाराने अर्जदार क्र. १ ही त्याच्यासह राहत असताना केलेल्या शारिरीक व मानसिक त्रासाबाबत मुळ अर्जात नमुद केले आहे. जाबदेणाराने देखील अर्जदार सध्या माहेरी राहत असल्याची बाब नाकारलेली नाही. त्याचप्रमाणे अर्जदारांच्या राहण्याची व खाण्यापिण्याची सोय केल्याचे कथन देखील जाबदेणाराने केले नाही. यावरुन प्रथमदर्शनी जाबदेणाराने अर्जदारास त्याची नैतिक जबाबदारी असताना देखील सांभाळण्यास टाळाटाळ केली असे दिसून येते.

८. एकंदरीत, अर्जदार व जाबदेणार यांची परस्पर विरोधी कथने व अभिलेखावर दाखल कागदपत्रे व त्यावरील विवेचनावरुन अर्जदार क्र. १ हिने जाबदेणारकडून झालेल्या मानसिक व शारिरीक त्रासाबाबत तसेच नैतिक जबाबदारी घेण्यास केलेली टाळाटाळ याबाबत स्पष्ट कथने केलेली आहेत. अर्जदार जाबदेणारपासुन विभक्त राहत आहेत. अर्जदार ही जाबदेणारपासुन विभक्त राहत असुन जाबदेणारने अर्जदारांचे दैनंदीन निर्वाहाबाबत नियमीतपणे व्यवस्था केलेली नाही.

९. अर्जदारांनी जाबदेणार हा शिक्षक असून त्यास दरमहा ८० ते ९० हजार रुपये पगार मिळतो तसेच किराणा दुकानापासून महिन्याला ८ ते ९ लाख रुपये उत्पन्न मिळते तसेच दोन गाळे भाडयाने असून सदर गाळयास २०,०००/– रुपये भाडे मिळत असल्याने कथन केले आहे. परंतु सदर कथनांच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. याउलट जाबदेणाराने देखील अर्जदार हिच्या आईवडीलांची आर्थिक परिस्थिती चांगली असून अर्जदार स्वतः नोकरी करते असे कथन केले आहे. परंतु जाबदेणाराने देखील त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. अर्जदार व जाबदेणार यांनी त्यांचे उत्पन्न व उत्तर दायित्वाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. जाबदेणाराने सदर प्रतिज्ञापत्रामध्ये त्याला रक्कम रुपये ३५,०००/– पगार असल्याचे कथन केले आहे. एकंदरीत अभिलेखाचा विचार करता जाबदेणार हा शारिरीकदृष्टया निरोगी आहे व काम

करण्यास सक्षम आहे. त्यामुळे त्याची अर्जदारास पोटगी देण्याची ऐपत आहे असे दिसून येते.

१०. अर्जदार क्र. १ ही जाबदेणाराची पत्नी असल्याने व अर्जदार क्र. २ ही अर्जदार क्र. १ व जाबदेणाराची मुलगी असल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी जाबदेणारावर आहे. जाबदेणाराने तो अर्जदार क्र. १ चा पती व अर्जदार क्र. २ चा वडील या नात्याने त्यांचे प्रती त्याची कोणतीही जबाबदारी पार पाडली नाही. अर्जदार क्र.२ चे सध्याचे वय पाहता तिचे शाळेत जाण्याचे वय आहे. जाबदेणार याने अर्जदार क्र. २ हिच्या शिक्षणाची कोणतिही सोय केली नाही. त्यामुळे अर्जदार अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम पोटगी मिळण्यास हक्कदार आहेत. अर्जदार क्र. १ हिने जाबदेणाराविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयाअंतर्गत अर्ज दाखल केला असून सदर अर्जामध्ये अर्जदारास अंतरिम पोटगी मंजूर झाली आहे. त्यामुळे सदर मंजूर झालेल्या अंतरिम पोटगीचा विचार करणे आवश्यक आहे.

११. एकंदरीत, अर्जदार व जाबदेणार यांचे परिस्थितीबाबत वरील विवेचनावरुन आणि सध्याची सामाजिक परिस्थिती पाहता जाबदेणाराने अर्जदारांच्या दैनंदीन खर्चासाठी, उदरनिर्वाहाकरीता अर्जदार क्र. १ हिस दरमहा रक्कम रुपये २,५००/– व अर्जदार क्र. २ हिस दरमहा रक्कम रुपये १,५००/–, अंतरीम आर्थिक सहाय्य देण्याचा आदेश करणे योग्य व रास्त वाटते. करीता, मी वादप्रश्न क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन वादप्रश्न क्र. २ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. जाबदेणार ने अर्जदार क्र. १ हिस दरमहा रक्कम रुपये २,५००/– व अर्जदार क्र. २ हिस दरमहा रक्कम रुपये १,५००/– अंतरिम आर्थिक सहाय्य म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखे पासुन पुढील आदेश होईपावेतो द्यावेत.

३. प्रस्तुत आदेशाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

स्वाक्षरी/–

ठिकाण इंदापूर (एस.बी.लेंडवे)
दिनांक १३/०२/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

| प्रमाणपत्र<br>मी याद्वारे असे प्रमाणित करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशातील मजकूराच्या शब्दानुसार समान आहे. | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | .. | श्रीमती एस. बी. लेंडवे<br>५वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर |
| लघुलेखकाचे नाव | .. | पी. डी. दुधभाते, लघुलेखक निम्नश्रेणी–३ |
| आदेशाची तारीख | .. | १३/०२/२०२६ |
| न्यायालयाने सही केल्याची तारीख | .. | १३/०२/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | .. | २०/०२/२०२६ |